महाराष्ट्र शासन

क्र:-संकीर्ण-१०१७/ प्र.क्र.१०५/१३स,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ०९ ऑगस्ट, २०२१.

प्रति,

सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

विषय :- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनिमय १९६० चे कलम १०१- प्रक्रिया शुल्काचे दर (Process Fee) वाढविणेबाबत.

संदर्भ:-
१) आपले जा.क्र.४-स.आ./कायदा व वैध.कार्य./क.१०१/प्रोसेस फी वाढ / ७३०/२०१९, दिनांक २४.१२.२०१९ रोजीचे पत्र.
२) आपले जा.क्र.४-सआ/ कायदा व वैध. कार्य./ क.१०१/ प्रोसेस फी वाढ/ १६९/२०२०, दिनांक १९.१०.२०२० रोजीचे पत्र.
३) आपले जा.क्र.४-सआ/ का. व वै. का./ कलम.१०१/ प्रोसेस फी वाढ/२०२०/२१०, दिनांक ११.१२.२०२० रोजीचे पत्र.
४) आपले जा.क्र.४-सआ/ कायदा व वैधा. कार्य./ क.१०१/ प्रोसेस फी वाढ/ १४४/२०२१, दिनांक १६.०६.२०२१ रोजीचे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयाशी संबंधित आपल्या संदर्भांकीत पत्रान्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१- प्रक्रिया शुल्काचे दर (Process Fee) वाढविणेबाबत प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम १०१ अन्वये, पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन लि., पुणे यांच्यामार्फत दिलेल्या वसुली दाखल्यांवर आकारण्यात येणारे प्रोसेस फी चे दर हे अत्यंत कमी असल्याने, तसेच, जिल्हा असोसिएशन ना नफा ना तोटा या तत्वावर चालत असल्यामुळे उत्पन्नावर मर्यादा येतात. त्यामुळे, वसुली यंत्रणेचा अतिरिक्त खर्चाचा भार उचलण्यास जिल्हा असोसिएशन असमर्थ असल्याचे आपल्या अहवालावरून दिसून येते.

०२. ६ व्या व ७ व्या वेतन आयोगामुळे अधिकाऱ्यांच्या वेतनात वाढ झाली आहे. गेल्या काही वर्षात कलम १०१ खाली दाखल होणाऱ्या प्रकरणांची संख्या घटत असल्याने, त्यातून जमा होणाऱ्या प्रोसेस फी मधून नागरी बँक असोसिएशन व पतसंस्था फेडरेशन यांना खर्च भागविणे अशक्य झाले आहे. असोसिएशन/ पतसंस्था फेडरेशनकडे परसेवेवर असणारे उपनिबंधकांचे वेतन हे शासनाने विहित

केल्याप्रमाणे, जमा झालेल्या प्रोसेस फी मधूनच करावयाचे असते. सध्या आकारत असलेले प्रक्रिया शुल्काचे दर हे कमी असल्याने व त्यामुळे, असोसिएशन/ पतसंस्था फेडरेशनला होणारा तोटा लक्षात घेता, **सुधारीत प्रक्रिया शुल्काचे दर (Process Fee) खालील तक्त्यात दर्शविण्यात आल्याप्रमाणे आकारण्यात यावेत. तसेच, सदर दर हे नागरी बँक फेडरेशन व पतसंस्था फेडरेशनसाठी देखील लागू राहतील.**

| अ.क्र. | दावा रक्कम (रुपये) | सुधारीत प्रक्रिया शुल्काचे दर (Process Fee) |
|---|---|---|
| १ | रुपये ५० हजारापर्यंत | रुपये ५००/- |
| २ | रुपये ५० हजारपेक्षा जास्त व रुपये १.०० लाखापर्यंत | रुपये ७००/- |
| ३ | रुपये १.०० लाखापेक्षा जास्त व रुपये ५.०० लाखापर्यंत | रुपये ७००/- अधिक एक लाखावरील प्रत्येक लाखास रुपये५०/-<br>(रुपये ७००+रुपये २००= रुपये ९००/-)<br>(जास्तीत जास्त रुपये ९००/-) |
| ४ | रुपये ५.०० लाखापेक्षा जास्त व रुपये १०.०० लाखापर्यंत | रुपये ९००/- अधिक पाच लाखावरील प्रत्येक लाखास रुपये १००/-<br>(रुपये ९००+रुपये ५००=रुपये १४००/-)<br>(जास्तीत जास्त रुपये १४००/-) |
| ५ | रुपये १०.०० लाखापेक्षा जास्त व रुपये २५.०० लाखापर्यंत | रुपये १४००/- अधिक दहा लाखावरील प्रत्येक लाखास रुपये १५०/-<br>(रुपये१४००+रुपये२२५०/-=रुपये३६५०/-)<br>(जास्तीत जास्त रुपये ३६५०/-) |
| ६ | रुपये २५.०० लाखावरील | रुपये ३६५०/- अधिक पंचवीस लाखावरील प्रत्येक लाखास रुपये २००/- (कमाल रुपये २०,०००/-) |

०३. सदर पत्राच्या निर्गमनामुळे, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१- प्रक्रिया शुल्काचे दर (Process Fee) वाढविणेबाबत यापूर्वी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश निष्प्रभावीत होतील.

आपला,

०८|०८|२०२१

(अनिल ज.चौधरी)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

निवडनस्ती कार्यासन १३स